# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### भारतीय रिजर्व्ह बँकेने पिक कर्जाबाबत जाहिर केलेली सुधारीत योजना

**(१) १५३६२ (२७-०१-२०१७) श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय रिजर्व्ह बँकेने दिनांक ११ मे, २०१२ रोजी पिक कर्जाबाबत सुधारीत योजना जाहीर करुन पिक कर्जासाठी केवळ पिकाचे तारण ठेवण्याबाबत बँकांना सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रु. १ लाख मर्यादेतील कर्जाच्या तारणासाठी बँकेने नोंदविलेल्या कर्जाचा बोजा कमी करण्याची मोहिम जिल्हाधिकारी, लातूर यांनी माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास राबविली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिजर्व्ह बँकेच्या उक्त निर्देशानुसार बीड जिल्ह्यासह राज्यातील कर्जदार शेतक-यांच्या ७ /१२ उता-यावरील कर्जाची नोंद कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही कली आहे,वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास कर्जदार शेतक-यांच्या ७ /१२ उता-यावरील नोंदी कमी करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) व्यापारी बँकांमध्ये रू. एक लाख रुपयापर्यंतच्या पीक कर्जासाठी तारण घेतले जात नाही. तथापी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४८ (अ) मधील तरतुदीनुसार कर्जदाराच्या जमिनीवर कर्ज रकमेचा भार/ बोजा इतर हक्कामध्ये निर्माण करतात. याबाबत रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे आवश्यक ते परिपत्रकीय आदेश निर्गमित करण्याबाबत सहकार आयुक्त, सहकारी संस्था, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील विनाअनुदानित मतीमंद मुलांच्या शाळांना अनुदान मंजूर करण्याबाबत**

**(२) ५६९३७ (२९-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील ४ विनाअनुदानित मतीमंद मुलांच्या शाळांना अनुदान मंजूर करावे अशी मागणी कुडाळ-मालवण मतदारसंघातील स्थानिक लोकप्रतीनिधीनीं दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी मा. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने आतापर्यंत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात आली ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :**(१) होय.

(२) आयुक्त, अपंग कल्याण,पुणे यांच्या कडून प्राप्त प्रस्तावावर शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील अंध, अपंग, मुकबधीर व अस्थिव्यंग शाळांवर कार्यरत असलेले कर्मचारी समाज कल्याण विभागात विविध योजनांची कामे सांभाळत असल्याबाबत**

**(३) ५९२२३ (२८-०८-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील अंध, अपंग,मुकबधीर व अस्थिव्यंग शाळांवर कार्यरत असलेले तब्बल ६ कर्मचारी मागील कांही वर्षापासून समाज कल्याण विभागात विविध योजनांचे काम सांभाळत असल्याचे नुकतेच माहे एप्रिल,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचा-यांचे प्रतिनियुक्तींचे कोणतेही आदेश नसताना अनधिकृतपणे उक्त विभागातील विविध योजनांचे काम पाहत असल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार सदर प्रकरणी जबाबदार असणा-या दोषी व्यक्तींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,नसल्यास,त्याची कारणे काय आहेत,?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :**(१) व (२) होय.

(३) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी दिनांक ३०.१०.२०१८ च्या आदेशान्वये प्रतिनियुक्तीवर

घेतलेल्या अपंगाच्या अनुदानित शाळामधील कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर, सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिलेले आहेत.
(४) प्रश्नच उदभवत नाही.

---

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (जि.वाशिम) विभागाअंतर्गत जमा होणारी शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मिळाली नसल्याबाबत**

**(४) ६०६४९ (२०-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत संबंधीत बँकेला जमा करण्यात आलेली शिष्यवृत्तीची रक्कम स्कॉलरशीपद्वारे वाशीम जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर अद्यापही जमा करण्यात आली नसून बँक व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, वाशीम यांच्याकडे माहे मे २०१६ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार सदरहू बँकेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती त्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०२-०२०१) :**(१) हे खरे नाही,
(२) व (३) विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना त्यांचा बँक तपशिल अचूक भरला नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम बँकेकडून विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा झाली नाही. बँक तपशिल चुकल्यामुळे इसीएस न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी बँकेकडून मागविण्यात आली असून, अशा विद्यार्थ्यांचा बँक तपशिल दुरुस्त करुन व सुधारीत बँक तपशिल बँकेस देवून सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात येत आहे.

---

**सामाजिक न्याय विभागाच्या (जि.सातारा) येथील मूक-बधीर शाळेतील शिक्षीकेला सन-१९९९ पासून वेतन दिले नसल्याबाबत.**

**(५) ६६०२६ (२७-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील सामाजिक न्याय विभागाच्या मूक-बधीर शाळेतील शिक्षिका श्रीमती आशा कुलकर्णी यांना सन-१९९९ पासून वेतन दिलेले नसल्याची व त्यांची परिस्थिती मरणासन्न अवस्थेत असल्याची गंभीर बाब माहे सप्टेंबर,२०१६ मध्ये वा दुस-या आठवड्यात निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**अपंगांच्या विशेष शाळा अंतर्गत कंत्राटी पद्धतीने काम करणा-या शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना मुळ वेतन श्रेणीमध्ये सामावून घेण्याबाबत**

**(६) ७१२८३ (२७-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांच्या विशेष शाळा अंतर्गत कंत्राटी पद्धतीने काम करणा-या शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना मुळ वेतन श्रेणीमध्ये सामावून दि. २१ एप्रिल,२०१६ रोजी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघ सोलापूर यांनी शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संघटनेच्या मागण्यांची शासनाने माहिती घेतली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) शासन स्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**परतवाडा (जि.अमरावती) येथील शंकरबाबा पापळकर यांच्या वझ्झर अनाथ आश्रमातील अपंग, मतिमंद मुले-मुली कायमचे अनाथालयात ठेवणेबाबत**

**(७) ७४२२२ (२१-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील शंकरबाबा पापळकर यांच्या वझ्झर आश्रमात अनाथ, अपंग, मतिमंद मुले-मुली वयाच्या १८ वर्षापर्यंत राहत असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या कायद्यानुसार अनाथ, अंपग, मतिमंदांना वयाच्या १८ वर्षापर्यंतच अनाथालयात ठेवता येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनाथ, अपंग व मतिमंद मुलांना अनाथालयात कायमचे ठेवण्याबाबत शासनाने आधारगृह काढण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ?

(५) असल्यास, सदर चौकशीअंती अनाथ, अपंग व मतिमंद मुले-मुलींना कायमचे अनाथालयात ठेवणेबाबत तसेच त्यांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :**(१) होय.

(२) अपंगांची विशेष शाळा/संहिता - २०१८ मधील तरतूदी नुसार १८ वर्षा नंतरही प्रवेशितांना नियमित ठेवण्याबाबतची तरतूद केली आहे.

(३) होय.

(४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**वर्ध्यात राबविण्यात आलेल्या पथदर्शी प्रकल्पात ४० टक्के रुई असलेल्या कापसाला ६ हजार रु.प्रति क्विंटल भाव मिळाल्याबाबत.**

**(८) ७४२९३ (०६-०५-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय कापूस संशोधन सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च ऑन कॉटन टेक्नॉलाजी, कृषी विभाग व कापूस विकास व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त सहकार्याने वर्धा, देवळी, सेलू, हिंगणधाट या चार तालुक्यात पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअंतर्गत शेतकऱ्यांना बीसीआय (बेटर कॉटन इनसेटिव्ह) अंतर्गत कापूस उत्पादनाचे शक्षिण दिले जात असून माहे जानेवारी, २०१७ मध्ये काढणी पश्चात घेण्यात

आलेल्या कार्यशाळेत कापूस घेवून आलेल्या शेतकऱ्याला ४० टक्के रुई असलेल्या कापूस वाणाला तब्बल ६ हजार रुपये प्रति क्विंटलचा दर देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार असा पथदर्शी प्रकल्प सर्वत्र राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०२-२०१९) :** (१) होय

(२) नाही .

(३) वर्धा जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांतर्गत कापसाची खरेदी केली जात नाही. तथापि, चांगल्या प्रतीच्या व अधिक रुई असलेल्या वाणाच्या कापसाला जास्त दर मिळावा यासाठी कापूस खरेदीदार, जिनींग प्रेसिंग फॅक्टरी व कापूस उत्पादक शेतकरी यांचे चर्चासत्र आयोजित करुन प्रयत्न केले जात आहेत .

(४) सदर प्रकल्पांतर्गत अधिक उत्पादनासाठी आधुनिक तंत्राचा वापर, कीड नियंत्रण , इलेक्ट्रॉनिक कापूस वेचणी यंत्राचा वापर यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण, प्रात्यक्षिक, शेतीवर थेट प्रशिक्षण, शिबीर आयोजनाद्वारे मार्गदर्शन केले जाते. त्यामूळे सदर पथदर्शी प्रकल्पाचे सकारात्मक परिणाम मिळाल्यानंतर पुढील उचि कार्यवाही करण्यात येईल .

(५) प्रश्न उद्भवत नाही .

---

**तंत्रशिक्षण संस्थांच्या (जि.वर्धा) येथे शिष्यवृत्तीत झालेला गैरव्यवहार**

**(९) ७४३४६ (२१-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११-१२ या कालावधीत वर्धा जिल्ह्यातील १२ आणि ९८ संस्थांवर शिष्यवृत्ती वाटपात गैरव्यवहार केल्या प्रकरणी नेमाडे समितीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,वर्धा जिल्ह्यातील ११९ संस्थांकडून शासकीय रक्कम वसूली व कारवाई थांबविणेकरीता स्थगीती आणली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,समाजकल्याण आयुक्तांनी दोन वेगवेगळे आदेश काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,समाजकल्याण विभागाने या संस्थांवर कोणती कारवाई केली वा करणार आहे ,

(५) नसल्यास विलंबनाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) तपासणीअंती नियमानुसार वसुलपात्र रक्कमेची वसुली संबंधित संस्थांकडून करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेतकऱ्यांना बाजार समितीतील सोयी सुविधा मिळण्याबाबत**

**(१०) ७८२२६ (२१-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बाजार समितीत एक वर्षापासून ते तीन वर्षापर्यंत शेतमालाचा व्यवहार करणाऱ्या शेतकऱ्यांना मताधिकार देण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना बाजार समितीतील अनेक सोयी सुविधा मिळणार आहेत, हे ही खरे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०२-२०१९) :** (१), (२) व (३) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत बाजार समितीच्या क्षेत्रात राहणाऱ्या व किमान १० आर इतकी जमीन धारण करणाऱ्या व ज्याने बाजार समितीमध्ये पाच वर्षात किमान तीन वेळा अधिसूचित कृषि उत्पन्नाची विक्री केली आहे, अशा शेतकऱ्यास मतदानाचा अधिकार देण्याबाबत महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये दिनांक १७.०१.२०१८ अन्वये दि. १३.०६.२०१७ रोजीपासून सुधारणा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन मंडळातर्फे मुंबईत नरीमन पॉईंट येथे दर रविवारी आयोजित करण्यात येत असलेल्या आठवडी बाजाराबाबत**

**(११) ७८३४४ (२४-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन मंडळातर्फे मुंबईत नरीमन पॉईट येथे दर रविवारी धान्य, भाज्या, फळे इत्यादींचा आठवडी बाजार भरविण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आठवडी बाजार रविवारी या सुट्टीच्या दिवशी भरविण्यात येत असल्यामुळे मंत्रालय, प्रशाकीय भवन इत्यादी आसपासच्या शासकीय आणि खाजगी कार्यालयातील कर्मचा-यांना आठवडी बाजाराचा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आठवडी बाजार रविवार ऐवजी अन्य कामाच्या दिवशी सुरू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०२-२०१९) :** (१) होय.

(२) शेतकरी आठवडे बाजार संकल्पना ही प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या शेतमालाला थेट बाजारपेठ मिळवून देणे तसेच ग्राहकांनाही उत्तम प्रतिचा शेतमाल रास्त दरात उपलब्ध करुन देण्यासाठी सुरु करण्यात आलेली आहे. नरीमन पॉईंट येथे बाजार सुरु करणेपुर्वी नरीमन पॉईंट व आजुबाजुच्या परिसरातील सहकारी हौसिंग सोसायट्यामध्ये केलेल्या सर्व्हेमध्ये जास्तीत जास्त नागरीकांनी आठवडे बाजार हा रविवारी भरविण्याबाबत सुचविले होते. आठवडे बाजाराच्या दिवशी जास्तीत जास्त ग्राहकांची गर्दी होणे अपेक्षित असल्याने मंत्रालय, विधानभवन इ. संवेदनशिल इमारतींच्या सुरक्षेच्या कारणास्तव सदर बाजार रविवारी भरविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. जेणेकरुन रविवार हा सुट्टीचा वार असल्याने याचा फायदा जास्तीतजास्त ग्राहक घेऊ शकतील व पर्यायाने शेतकऱ्यांच्या शेतमालाची जास्तीत जास्त विक्री होऊ शकेल.

(३) रविवारी सुरु असलेल्या शेतकरी आठवडे बाजारात शेतमाल विक्रीसाठी सहभागी होणारे शेतकरी हे नाशिक, पुणे व आजुबाजुच्या जिल्ह्यातील विक्रीसाठी आलेले असतात. साधारणत: २५ ते ३० शेतकरी/शेतकरी गट/ शेतकरी उत्पादक कंपन्या सहभाग घेतात. रविवार व्यतिरिक्त, इतर दिवशी रस्त्यावरील वाहनांची वर्दळ जास्त असते आणि त्यामुळे वाहतूकीस अडथळा होण्याची शक्यता असल्याने शेतकरी आठवडे बाजार रविवार व्यतीरिक्त इतर दिवशी भरविणे संयुक्तीक होणार नाही.

---

## राज्यात कापसाच्या दरात झालेली घसरण

**(१२) ८२६४४ (०६-०५-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक बाजारात कापसाचे दर अधिक असताना राज्यात कापसाचे दरात घसरण झाल्याचे माहे फेब्रुवारी,२०१७ मध्ये वा च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पाच हजार ७०० रूपये व यवतमाळ जिल्ह्यात सहा हजार रुपये असलेला कापसाचा दर आता पाच हजार ४०० ते पाच हजार ५७० रुपयांवर स्थिरवल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) हंगाम २०१६-१७ मध्ये केंद्रशासनाने कापसासाठी रु. ४१६० प्रति क्विंटल किमान आधारभूत किंमत जाहिर केली होती. फेब्रुवारी २०१७ मध्ये जागतिक बाजारपेठेत कापसाची किंमत रु.५३०५ प्रति क्विंटल होती. त्याचवेळी राज्यात रु.५८०० प्रति क्विंटल दराने कापसाची खरेदी सुरु होती.

(२) फेब्रुवारी २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात राज्यातील कापसाचे दर रु.४८०० ते ५८३० प्रति क्विंटल च्या दरम्यान होते. त्याचवेळी यवतमाळ जिल्ह्यात कापसाचे दर रु.५२०० ते ५७०० प्रति क्विंटल इतके होते.

(३) हंगाम २०१६-१७ मध्ये कापसाला मिळणारा बाजारभाव किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असल्याने खाजगी व्यापाऱ्यांकडून झालेली कापसाची खरेदी २२५ लाख क्विंटल असून, यवतमाळ जिल्ह्यातील कापसाची खरेदी १६.२२ लाख क्विंटल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदे विक्री केलेल्या शेतक-यांना देण्यात येणारे अनुदान

**(१३) ८४०१९ (२१-०४-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई वगळता अन्य कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जुलै व ऑगस्ट, २०१६ मध्ये कांदे विक्री केलेल्या शेतक-यांना प्रतिक्विंटल रुपये १०० अनुदान देण्याच्या प्रस्तावावर शासनाकडून सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, अनुदान देण्याच्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती शेतक-यांना एकूण किती रकमेच्या अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) :** (१ ) होय.
(२) व (३) कांदा अनुदान योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना निधी वितरित करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ३.०७.२०१७ अन्वये निधी उपलब्ध करुन दिला असून, प्रस्तुत योजनेंतर्गत १७ जिल्ह्यातील १,०३,१४३ शेतकऱ्यांना रुपये ४१.३३ कोटी अनुदान वितरित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुदानित आश्रमशाळांमधील विदयार्थ्यांना पुरेशा आरोग्याच्या व आहाराच्या तसेच शिक्षणाच्या सुविधा मिळत नसल्याबाबत

**(१४) ८४१८८ (२८-११-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या लाखो विदयार्थ्यांना पुरेशा आरोग्याच्या व आहाराच्या तसेच शिक्षणाच्या सुविधा मिळत नसल्याने गत ३ वर्षात सुमारे १५० विद्यार्थ्यांचा मृत्यु झाला असल्याचे माहे फेब्रुवारी,२०१७ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषत: सर्पदंश, विंचूदंशामुळे तसेच आश्रमशाळांत पुरविण्यात येणा-या निकृष्ट दर्जाचा आहार, आश्रमशाळांतील अस्वछता तसेच आश्रमशाळांपासून दुर असलेली आरोग्य केंद्रे या बाबी एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या मृत्यूला कारणीभूत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना अद्यापपर्यंत सानुग्रह अनुदानदेखील मिळालेले नसून या मृत्यूंची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(४) तदनुसार आश्रमशाळांतील मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०८-२०१८) :** (१) व (२) मागील पाच वर्षांमध्ये (सन २०११-१२ ते २०१५-१६) या कालावधीत राज्यातील शासकिय आश्रमशाळांमध्ये विविध कारणांनी ४३६ विदयार्थ्यांचा मृत्यु झाल्याची बाब आढळुन आली आहे.

सदर मृत्युच्या कारणामध्ये प्रामुख्याने सर्पदंश, विंचुदंश, पाण्यात बुडुन, अपघात, नैसर्गिक मृत्यु इत्यादींचा समावेश आहे.

(३) आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांचा कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यास त्यांचे पालकोना सानुग्रह अनुदान देण्याची तरतुद असुन त्यानुसार मृत्युच्या घटनांमध्ये विदयार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(४) शासकिय आश्रमशाळांमधील शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांच्या विविध कारणांनी मृत्यु झाल्याच्या घटना आढळुन आल्याने सदर मृत्युच्या कारणांचा अभ्यास करुन सदर मृत्युंच्या कारणांचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने स्वत:हुन निवृत्त आरोग्य महासंचालक डॉ सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापनाकेली होती सदर समितीने विदयार्थी मृत्युचा अभ्यास करुन सदर घटना रोखण्यासाठी दिर्घकालीन व अल्पकालीन शिफारशी सुचविल्या असुन सदर समितीच्या बहुतांश शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

---

## नाशिक जिल्हा परिषदेने रस्त्यांची कामे करताना मागदर्शन सूचनांचे पालन न केल्याबाबत

**(१५) ९३६५१ (१९-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेने २१ कोटी रुपयांची रस्त्यांची कामे दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मंजूर केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक ३ सप्टेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शन सूचनांचे पालन झाले नसल्याची तक्रार जिल्हा परिषदेच्या माजी पदाधिका-यांनी मा. मुख्यमंत्री,मा. ग्रामविकास मंत्री, विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-०९-२०१८) :**

(१) नाशिक जिल्हा परिषदेने २१ कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामांना मान्यता दिलेली नसून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.जिनिस/का.५(१)/आउयो/१६-१७/प्र.क्र.३४/ ८४०, दि.३१/०३/२०१७ अन्वये प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

(२) अशा आशयाचे वृत्त वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले होते व मा.मंत्री (आ.वि.) यांचेकडे तक्रार प्राप्त होती.

(३) व (४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि. २९ ऑक्टोंबर,२०१६ अन्वये, दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाला स्थगिती देऊन सदर शासन निर्णयातील तरतुदी दि.१ एप्रिल,२०१७ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. विषयांकित २१ कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामांना यापुर्वी प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असल्याने दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झालेले नाही.

---

**राज्यातील वस्त्रोद्योग वाढीव वीज दर, अनुदानातील कपात इ. समस्याबाबत**

**(१६) ९७४२३ (१३-०७-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वस्त्रोद्योग वाढीव वीज दर, अनुदानातील कपात यामुळे तोटयात जाऊन वस्त्रोद्योग व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वस्त्रोद्योगाला उर्जितावस्था आणण्याकरीता अनुदान, वीज दर कमी, उद्योग वाढ, आधुनिकीकरण, उत्पादनाला हमी भाव या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, वस्त्रोद्याग व्यवसायासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०२-२०१९) :** (१) शासनाच्या दि.०७.११.२०१५ च्या शासन निर्णयानुसार शासनातर्फे लघुदाब यंत्रमाग ग्राहकांना देण्यात येणारे प्रती युनिट अनुदान कायम ठेवायचे असून वाढीव वीजदर ग्राहकाने भरावयाचा आहे. त्यानुसार दि.०१.११.२०१६ पासून २० अश्वशक्तीच्या आतील यंत्रमाग ग्राहकांना रू.२.७७ प्रति युनिट व २० अश्वशक्तीच्या वरील यंत्रमाग ग्राहकांना रू.४.२२ प्रति युनिट सवलत शासनातर्फे देण्यात येते.

(२) (३) व (४):- राज्यातील वस्रोद्योगाचा विकास करणेसाठी महाराष्ट्र शासनाने वस्रोद्योग धोरण २०१८-२३ जाहीर केले आहे. या धोरणा अंतर्गत वस्रोद्योगातील सर्व क्षेत्रांना विविध प्रोत्साहने व वीज सवलती घोषित केल्या आहेत.

---

**नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांचे तुरीचे थकीत चुकारे अदा करण्याबाबत**

**(१७) १०३०८१ (०२-०१-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात बाजार हस्तक्षेप योजनेच्या माध्यमातून विविध केंद्रावर दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत २३ हजार १९५.५० क्विंटल तूर शासनाकडून खरेदी करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तूरीचे अद्याप चूकारे अदा करण्यात आले नसून, शासनाकडे शेतकऱ्यांचे सुमारे ११ कोटी ७१ लाख रुपये थकविले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन शेतकऱ्यांचे तुरीचे थकीत चूकारे अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०२-२०१९) :** (१)अंशत: खरे आहे.

(२) व (३) नाही

हंगाम २०१६-१७ मध्ये नाफेडमार्फत व राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत आधारभूत दराने तूर खरेदी करण्यात आली आहे. बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ७ खरेदी केंद्रावर दिनांक ३१/०८/२०१७ अखेर ६२,२१५.७१ क्विंटल तूर खरेदी झाली आहे. सदर तूर खरेदीचे रुपये ३१,४१,८९,३३५/- इतकी रक्कम संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाज कल्याण विभागमार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान न केल्याबाबत**

**(१८) १०४४८४ (१३-०७-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, अश्वच्छ कामगारांचे पाल्यांना शिष्यवृत्ती आणि गुणवत्ता शिष्यवृत्ती ह्या समाज कल्याण विभागमार्फत चालविण्यात येणाऱ्या योजना आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तीनही योजनेद्वारे गेल्या शैक्षणिक वर्षापासून ते आजतागायत संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०२-२०१९) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत.**

**(१९) १०४५०६ (१३-०७-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी व विशेष मागास प्रवर्गातील सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या २५३४ महाविद्यालयीन विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून अद्यापपर्यंत वंचित असल्याची बाब समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे काय तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सन २०१६-१७ या वर्षात परभणी जिल्ह्यातील महाविद्यालयामार्फत सहायक आयुक्त, समाज कल्याण, परभणी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले अनुसूचित जातीचे १०२६९, विजाभज प्रवर्गाचे ७९५७, इमाव प्रवर्गाचे ५११९ व विमाप्र प्रवर्गाचे ३३८ असे एकूण २३६८३ अर्ज निकाली काढण्यात आले असुन, कोणताही पात्र विद्यार्थी शैक्षणिक लाभापासून वंचित राहिल्याची बाब आढळून आलेली नाही.

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्थ अनुसूचित जमाती प्रवर्गातील नोंदणीकृत एकूण १३९७ अर्जापैकी ११६९ अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी यांनी निकाली काढले असून, महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले २२८ अर्ज त्वरेने निकाली काढण्याबाबत तसेच अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास महाविद्यालयाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना आदिवासी विकास विभागा मार्फत संबंधित महाविद्यालयांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) येथील उपविभागीय ऊर्जा कार्यालयातील कर्मचा-यांच्या विविध समस्यांबाबत**

**(२०) १०८८११ (०४-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील उपविभागीय ऊर्जा कार्यालयातील कर्मचा-यांच्या विविध समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्य अभियंता, महावितरण कंपनी बारामती परिक्षेत्र, पुणे यांना दिनांक २६/१०/२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू कामगारांच्या मागण्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्यांचे निराकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०२-२०१९) :** (१) दि.२६.१०.२०१७ चे निवेदन मुख्य अभियंता, महावितरण कंपनी बारामती परिक्षेत्र, पुणे यांना प्राप्त झाले असून त्यामध्ये महावितरणचे

उपविभागीय कार्यालय, भोर (जि.पुणे) मधील विविध कामांच्या समस्यांचे निराकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(२) व (३) महावितरणचे उपविभागीय कार्यालय, भोर (जि.पुणे) मधील विविध कामांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत महावितरण कंपनीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात मुकबधीर प्रवर्गाच्या शाळांमधील अभ्यासक्रमात समानता नसल्याबाबत.**

**(२१) १०९१२९ (२०-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुकबधीर प्रवर्गाच्या शाळांमधील अभ्यासक्रमात समानता नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे मुकबधीर विद्यार्थ्यांच्या येणाऱ्या अडचणी विचारात घेता समान अभ्यासक्रम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील वीज कर्मचारी संघटनांनी समान काम समान वेतनाबाबत केलेली मागणी**

**(२२) १०९३६९ (०४-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज कर्मचारी संघटनांनी समान काम समान वेतन द्यावे , कंत्राटी पद्धत बंद करावी व वीज क्षेत्रातील कारभार सुधारावा या मागण्यांसाठी मुंबईतील प्रकाशगड व प्रकाशगंगा या कार्यालयासमोर दि.२८ डिसेंबर,२०१७ रोजी आंदोलन केले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी वीज कर्मचा-यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने खात्यामार्फत सुधारणा घडवून आणणे, सर्व कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करणे, कंत्राटी व सुरक्षा रक्षकांना सेवेत कायम करणे व त्यांच्या वेतनात वाढ करणे, समान काम समान वेतन संदर्भातील निर्णयांची अंमलबजावणी करणे या व इतर मागण्यांबाबत प्रधान सचिव (ऊर्जा) व तिन्ही वीज कंपन्यांच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या स्तरावर संघटना प्रतिनिधींसोबत दि.०३.०१.२०१८ रोजी चर्चा करण्यात आली व चर्चेच्या अनुषंगाने तिन्ही वीज कंपन्यांच्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

---

**दहिवली (ता.माण, जि.सातारा) येथील अस्थिव्यंग मूलांच्या निवासी शाळेच्या अनुदानाबाबत**

**(२३) ११२५०० (२१-०४-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिवली (ता.माण, जि.सातारा) येथील अस्थिव्यंग मूलांच्या निवासी शाळेच्या मान्यतेसाठी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सातारा यांच्यामार्फत दिनांक २१ फेब्रुवारी, १९९९ मध्ये वा त्यासुमारास अपंग आयुक्त, पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ६ जून, २००५ रोजी वा त्यासुमारास शाळेला कायम अनुदानीत तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळा नवीन धोरण अंमलात येण्यापूर्वी सुरु केलेली असल्याने कायमस्वरुपी विनाअनुदानीत शब्द लागू होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाने अपंगाच्या १२३ शाळांना १०० टक्के अनुदान तत्वावर मान्यता देऊन त्यामध्ये ३४ क्रंमाकावर संस्थेचे अनुदानासाठी पात्र म्हणून नाव आले असतानाही अदयापी या शाळाला कोणतीही अनुदान दिलेले नाही, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अस्थिव्यंग मूलांच्या निवासी शाळेला कायमस्वरुपी अनुदानीत तत्वावर मान्यता देऊन अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०२-२०१९) :** (१) (२) व (३) होय.
(४) कार्यवाही सुरु आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने दिव्यांगांना देण्यात येणारा निधी शिवाजीनगर येथील एसबीआय शाखेने तांत्रिक कारणावरुन रोखल्याबाबत**

**(२४) ११२५९३ (३१-१०-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने ३ टक्के निधीतून ८९ दिव्यांगांना देण्यात येणारे १७ लाख ८९ रुपये शिवाजीनगर येथील एसबीआय शाखेने तांत्रिक कारणावरुन रोखल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर दिव्यांग ३ टक्के निधीपासून वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांगाची यादी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाला पाठवून बँकेने सदर रक्कम दिव्यांगाच्या बॅक खात्यावर जमा करावी, अन्यथा बॅकेसमोर ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्याचा इशारा दिव्यांगांनी निवेदनाद्वारे दिला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०२-२०१९) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) होय.

(४) चौकशी केलेली नाही तथापि ८९ लाभार्थ्यांकरिता रु.१७.८० लक्ष बँकेत जमा केले असून त्यापैकी ५६ लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा केला आहे.

उर्वरित २३ लाभार्थ्यांचा निधी एसबीआय बँकेने तांत्रिक कारणास्तव रोखला असल्याने याबाबत सदर रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी पाठपूरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**थकित कर्जदार शेतकऱ्यांस कर्जावरील व्याजमाफ करण्याची योजना शासनाने जाहीर करण्याबाबत**

**(२५) ११२७७७ (२३-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थकित कर्जदार शेतकऱ्यांस कर्जावरील व्याज काही प्रमाणात माफ करण्याची योजना शासनाने जाहीर केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी कृषी पिक कर्ज घेतलेले आहे, पण कर्ज पुनर्गठीत केलेले आहे अशा शेतकऱ्यांना सदरहु योजनेचा लाभ मिळणार नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी पिक कर्जाचे ज्या शेतकऱ्यांनी कर्ज पुनर्गठीत केलेले आहे अशांना सदरहु योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही
दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२००९ या कालावधीत घेतलेल्या कर्जापैकी केंद्र व राज्य शासनाच्या सन २००८ व सन २००९ च्या कर्जमाफी योजनांचा फायदा न मिळालेल्या दि. ३०.०६.२०१६ रोजी थकीत असलेल्या पीक / पुनर्गठीत व मध्यम मुदत कर्जाचा योजनेत समावेश करण्यात आला आहे .
दि. ३०.०६.२०१६ पूर्वी किंवा नंतर पुनर्गठीत / फेरपुनर्गठीत झालेल्या कर्जाची ३१.०७.२०१७ पर्यंत थकीत व उर्वरीत हप्ते रु. १.५० लाख मर्यादेपर्यंत असल्यास त्याचा कर्जमाफी योजनेत समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तूर खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी तूर जाळल्याबाबत**

**(२६) ११५२४२ (०४-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तूर खरेदी केंद्रावर दहा ते बारा शेतकऱ्यांनी आणलेली तूर पाहणी न करताच तूरमध्ये भुंगा, हिरवे दाणे, मुकण्या आहेत असे कारण दाखवून नाकारण्यात आल्यामूळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावरच आणलेली तूर जाळून टाकल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी काही काळ खरेदी केंद्र बंद ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच तूर खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) :** (१) नाही.
(२) होय.

(३) होय.

दिनांक ०९/०२/२०१८ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती जाधववाडी, औरगांबाद येथील खरेदी केंद्रावर ९ शेतकरी तूर विकण्यासाठी आले होते.त्यापैकी २ शेतकऱ्यांनी त्यांच्या तूरीची तपासणी करण्यास नकार दिल्यानंतर उर्वरित ७ शेतकऱ्यांच्या समक्ष सँम्पल घेऊन ग्रेडरकडून तूरीची तपासणी करण्यात आली.तपासणीअंती ३ शेतकऱ्यांची तूर FAQ दर्जाची असल्यामुळे खरेदी करण्यात आली.तद्नंतर ४ शेतकऱ्यांच्या तूरीची चाळणी करुन FAQ प्रतीची २ शेतकऱ्यांची तूर खरेदी केली व उर्वरित २ शेतकऱ्यांच्या तूरीत अपरिपक्व बियांचे प्रमाण आवश्यक ४ % प्रमाणापेक्षा जास्त असल्याने खरेदी केली नाही.त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी १ ते १.५० किलो तूर खरेदी केंद्रासमोरील मोकळया जागेत जाळली.नाफेडच्या वतीने हमीभावाने खरेदी करण्यात येत असलेली तूर ही fair Average Quality(FAQ) च्या दर्जाची असणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खरीप पीक कर्जपुरवठ्याचे जिल्हानिहाय नियोजन मिशन मोड मध्ये करण्याबाबत**

**(२७) ११६८०४ (०१-०८-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-यांची आर्थिक गरज भागविण्यासाठी जिल्हाधिका-यांनी सहकार विभागाच्या यंत्रणेची मदत घेऊन खरीप पीक कर्जपुरवठ्याचे जिल्हानिहाय नियोजन मिशन मोड मध्ये करण्याचे निर्देश माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामपूर्व आवश्यक असलेल्या उपाययोजनांचे स्वरुप काय असुन त्यानुषंगाने शेतक-यांना गुणवत्तापूर्ण बियाणे, खते पुरवठा व शेतक-यांची आर्थिक गरज भागवण्यासाठी त्यांना १०० टक्के कर्जमाफी देण्यास जिल्हाधिकारी व सहकार विभाग यांनी अंमलबजावणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतक-यांना गुणवत्तापूर्ण बियाणे, खते पुरवठा व शेतक-यांची आर्थिक गरज भागवण्यासाठी त्यांना १०० टक्के कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) " उन्नत शेती - समृद्ध शेतकरी " मोहिमेच्या माध्यमातून दि. २४ मे ते ०७ जुन

२०१८ या कालावधीत कृषी विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांनी गावपातळीपर्यंत शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविण्याचे तसेच, अद्यावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम केले. कृषी निविष्ठा उपलब्धतेचे नियोजन करण्यात आले .

राज्यामध्ये सन २००१-०२ पासून असलेल्या सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी शासन निर्णय दि. २८.६.२०१७ अन्वये "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७" घोषित करण्यात आलेली आहे. या योजनेनुसार दि. १.४.२००१ व त्यानंतर पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या तसेच त्यापैकी दि. ३०.६.२०१६ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतक-यांना काही निकषांच्या अधिन राहून कर्जमाफी व इतर लाभ देण्याचा निर्णय झालेला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अन्वये दि. ०१.०२.२०१९ अखेर पर्यंत ४३.०३ लाख खातेदारांना रु. १८,०४०/- कोटींचा लाभ देण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मोहाडी (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना नाफेडच्या उडीद खरेदीचे चुकारे अदा करण्याबाबत**

**(२८) ११९४१४ (२३-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोहाडी (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील ५ शेतकऱ्यांना नाफेडच्या उडीद खरेदीच्या चुकाऱ्या पोटी अदा करण्यात आलेला सेंट्रल बँक ऑफ इंडिया, चिखली या शाखेचा धनादेश दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास वटला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सदर शेतकरी ऐन पेरणीच्या दिवसात अडचणीत आले असून त्यांनी आमरण उपोषण / आत्मदहनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०२-२०१९) :** (१) होय.

(२), व (३) संबंधित शेतकऱ्यानी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, चिखली यांनी संस्थेकडे चौकशी केली असून, संस्थेने अन्य स्वंतत्र धनादेशाद्वारे संबंधित शेतकऱ्यांना शेतमालाचे संपूर्ण चुकारे अदा केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या अनुदान तत्वावर चालविण्यात येणाऱ्या कृषी प्रक्रिया संस्थांना अनुदान मिळत नसल्याबाबत**

**(२९) १२०९३८ (२४-०७-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अनुदान तत्वावर चालविण्यात येणाऱ्या कृषी प्रक्रिया संस्थांना दोन वर्षापासून वेळेवर अनुदानच मिळत नसल्याने राज्यातील ११२ संस्थांपैकी २५ संस्था बंद झाल्या असून त्यातील कोल्हापूर जिल्हयातील ३५ पैंकी ११ संस्था बंद झाल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी प्रक्रिया संस्थांना शासनाकडून अनुदान वाटप झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कृषी प्रक्रिया संस्थांना अनुदान वाटप देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०२-२०१९) :** (१), (२) व (३) राज्यातील ११२ कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य वितरित करण्यात आले असून त्यापैकी २५ संस्था बंद आहेत व कोल्हापूर जिल्ह्यातील ३६ पैकी ११ संस्था बंद आहेत, हे खरे आहे. तथापि, सदर संस्थांना अर्थसहाय्य मिळत नसल्याने बंद झाल्या, हे म्हणणे खरे नाही.

ज्या संस्था बंद आहेत, त्यांना पूर्ण अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य वितरित करण्यासाठी दर वर्षी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात येते. त्यानुसार, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात रु.१८५०.०० लाख एवढी तरतूद करण्यात आलेली आहे व सन २०१९-२० साठी रु.२५००.०० लाख एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीचे वाटप विहीत व अटीची पूर्तता करणाऱ्या संस्थाना दर वर्षी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वस्त्रोदयोगास ५ टक्के व्याज अनुदान आणि वीज दरात सवलत देण्याबाबत**

**(३०) १२७१४६ (०६-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील वस्त्रोद्योग परिषदेत माहे जुलै, २०१६ मध्ये दिलेले ५ टक्के व्याज अनुदान आणि वीज दरात १ रुपयेच्या सवलतीच्या आश्वासनाची पुर्तता करुन

सन २०१८ च्या नवीन वस्त्रोद्योग धोरणाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणी विटा यंत्रमाग संघ व इतर संघटनाच्या वतीने मा.सहकार मंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०२-२०१९) :** (१) (२) व (३) :- विटा यंत्रमाग सहकारी संघ यांचे दि. ०२.०९.२०१८ चे निवेदन या विभागात प्राप्त झाले आहे. साध्या यंत्रमागाच्या कर्जावरील ५% व्याज ५ वर्षासाठी शासनामार्फत अदा करण्याबाबत दि. ०५.१२.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असुन त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तसेच राज्यातील वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी वस्त्रोद्योग धोरण सन २०१८-२३ , दि. १५.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. धोरणात जाहीर केल्याप्रमाणे राज्यातील वस्त्रोद्योगांना वीज दरात सवलत देण्यासाठी दि. २१.१२.२०१८ रोजी प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. वस्त्रोद्योगांना भांडवली अनुदान देण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

---

**राज्य शासनाच्या निकषांची पुर्तता करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी समभाग निधीमधून (इक्विटी फंड) लघू व मध्यम उद्योगात गुंतवणूक करण्याचा शासनाच्या विचाराधीन असलेला प्रस्ताव**

**(३१) १२७३१७ (०४-१२-२०१८) श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या निकषांची पुर्तता करणाऱ्या उद्योगांना शेअरबाजारातून भांडवल उभारतांना मदत व्हावी आणि उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी समभाग निधीमधून (इक्विटी फंड) लघू व मध्यम उद्योगात गुंतवणूक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावातील योजनेचा समावेश राज्याच्या नवीन औद्योगिक धोरणात करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) नवीन औद्योगिक धोरण आखणीसंदर्भात सर्व Stakeholders समवेत राज्य शासनाची चर्चा / विचारविनिमय सुरु आहे.

त्याचाच एक भाग म्हणून लघु व मध्यम उद्योजकांना भांडवल उभारणी करताना शेअर बाजारातून मदत व्हावी यासाठी प्रोत्साहन देणेबाबत प्रस्तावाची तपासणी उद्योग संचालनालयाकडे सुरु आहे.

---

**खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीची योजना पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत**

**(३२) १२७९५८ (०४-१२-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वा त्यानंतर प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीची योजना पूर्ववत सुरु ठेवण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०२-२०१९) :** (१) नाही

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुरंबे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे सहकारी तत्वावर जिजामाता को-ऑपरेटिव्ह रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(३३) १२८९९३ (०४-१२-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुरंबे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे सहकारी तत्वावर जिजामाता को-ऑपरेटिव्ह रुग्णालय सुरु करण्याची घोषणा माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाच्या बांधकामास सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात पारधी घरकूल योजने अंतर्गत मिळणारी रक्कम घरकुल लाभार्थ्यांना मस्टरद्वारे काढता येत नसल्याबाबत**

**(३४) १२९८९९ (०५-१२-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात पारधी घरकूल योजनेतंर्गत मिळणारी रक्कम घरकुल लाभार्थ्यांना मस्टरद्वारे काढता येत नसल्याने संबंधित लाभार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मस्टरद्वारे रक्कम देण्याबाबत मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांना दि. ८ मे, २०१८ रोजीच्या पत्रांनुसार कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०२-२०१९) :** (१) (२) व (३). पंचायत समिती धामणगांव अंतर्गत मे २०१८ व त्यासुमारास पारधी आवास घरकुल योजने अंतर्गत मस्टर काढण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. परंतु तांत्रिक अडचण सोडविण्यात आली असून सद्य:स्थितीत पारधी आवास घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे हजेरीपत्रक नियमित निर्गमित होत आहेत.
(४) प्रश्न उद्द्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असल्याबाबत**

**(३५) १२९९६८ (०४-१२-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातर्फे विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढावी व अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेतंर्गत शिष्यवृत्ती मिळण्यापासून नाशिक जिल्ह्यातील सुमारे एक लाखाहून अधिक आदिवासी विद्यार्थी मागील चार वर्षापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,

(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार नाशिक जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांना उपरोक्त योजने अंतर्गत शिष्यवृत्ती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाईन पध्दतीने ई विकास या संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येत होती. सदर प्रणालीला तांत्रिक अडचणी उदभवल्या होत्या. त्यामुळे, नाशिक जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत वेळेवर शिष्यवृत्ती अदा करता आली नाही. परंतु सदर योजना आता ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरीत केली आहे.

(२) व (३) सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेचे सर्वाधिक लाभार्थी हे जिल्हा परिषदेच्या शाळांतील असतात यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याची प्रक्रिया अधिक गतीमान करण्यासाठी सदर योजना ग्राम विकास विभागाकडे दिनांक १७.४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तसेच शासन पत्र क्रमांक शिष्यवृ२०१८/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक १५.१.२०१८ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्यास्तरावरुन सदरची योजना राबविण्याचे निर्देश देवून कार्यपध्दती ठरवून देण्यात आलेली आहे.

सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन नोंदणी करणे शक्य झाले नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव ऑफ लाईन पध्दतीने मंजूर करुन जिल्हा परिषद, नाशिक यांच्या मार्फत शिष्यवृत्तीच्या लाभाच्या रक्कमा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्या आहेत.

सन २०१५-१६ मध्ये २,७३,३११ व सन २०१६-१७ मध्ये २,२८,४६८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला. या करीता सन २०१७-१८ मध्ये रुपये १६९३.५० लाख व सन २०१८ मध्ये रुपये १८००.०० लाख जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे वर्ग केले आहेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांचेमार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**आदिवासी विद्यार्थ्यांना (जि.चंद्रपूर) येथील वसतीगृहात प्रवेश मिळत नसल्याबाबत.**

**(३६) १३०६६४ (०६-१२-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी चंद्रपूर व अन्य जिल्हयाच्या मुख्यालयी निवास व्यवस्था म्हणून शासनाने सुरु केलेल्या वसतिगृहात आदिवासी विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळत नसल्याची बाब दिनांक १० सप्टेबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची बहुतांश वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत असून तेथे विद्यार्थ्यांना जागा अपुरी पडत असल्याने ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहात निवास व्यवस्था उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या उच्च शिक्षणावर परिणाम होत असून प्रवेश पटसंख्येपेक्ष्या अधिक आदिवासी विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त होत आहेत मात्र जागेच्या कमतरतेमुळे प्रवेश नाकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार वसतिगृहात आदिवासी विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता ४९१ वसतीगृहे असून त्यापैकी ३१८ वसतीगृहे ही भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. तथापि, सदर वसतीगृहांच्या मंजूर विद्यार्थी क्षमते एवढया अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नियमानुसार वसतीगृहांमध्ये प्रवेश दिला जातो.

(३) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाअंतर्गत एकूण ४९१ वसतीगृह कार्यरत असून वसतीगृहामधील विद्यार्थ्यांची क्षमता ५८,४९५ इतकी आहे. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण ५४२६७ विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश देण्यात आलेला आहे.

ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांकरीता पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयम् योजनेव्दारे निवासाची, आहाराची तसेच शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याकरीता अर्थसहाय्य करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील पाणी पुरवठा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) १३०७४८ (२९-१२-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील पाणी पुरवठा विभागातील २२ मंजूर पदांपैकी १६ पदे रिक्त असल्याने येथील अनेक पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना पाण्यासाठी कायम भटकंती करावी लागत असून जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही, हिंगोली जिल्हयातील पाणी पुरवठा विभागातील मंजूर ९१ पदांपैकी ५५ पदे भरलेली आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत एकूण १२९ नळ पाणी पुरवठा योजना असून त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०१८ अखेर ३२ योजना अंतिम करण्यात आल्या आहेत व उर्वरित ९७ योजना ३१ मार्च २०१९ पर्यन्त पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ करिता एकूण ८७ योजनांची कामे मंजूर असून रिक्त पदांमुळे पाणी पुरवठा योजना प्रलंबित नाही. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही देखील सुरु आहे.
(२) हे खरे नाही,
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोईसर (ता.जि.पालघर) येथे दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(३८) १३१६८८ (१०-१२-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथील ओम साई नगर, आनंदी नगर व आदर्श नगर परिसरातील नागरिकांना मातीमिश्रित दूषित पाण्याचा पुरवठा होत असून पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या दुसऱ्या पंधरवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुषित पाण्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर परिसर हा बोईसर (ता.जि.पालघर) जवळील सरावली या ग्रामपंचायतीत येत असून येथील पाईप लाईन माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये नादुरूस्त झाली होती. परिणामी या परिसरात एक दिवस मातीमिश्रित व गढूळ पाणीपुरवठा झाला होता.
(२) व (३) त्याकाळात ग्रामपंचायती मार्फत मेडीक्लोरचे वाटप ग्रामस्थांना करण्यात आले होते. सदर पाईपलाईनची दुरूस्ती करून त्वरीत पाणी पुरवठा सुरळीत केला आहे. अपु-या पाणी पुरवठ्यावर उपाययोजना म्हणून नवीन दोन सहा इंची नळ जोडण्या मंजूर झाल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सरावली ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्यावर कोणत्याही प्रकारचा विपरीत परिणाम झालेला नाही.
(४) प्रश्न उद्दभवत नाही.

---

**पुणे, मुळा-मुठा नदीच्या पाण्यात घातक जीवाणू आढळून आल्याबाबत**

**(३९) १३१८५४ (०६-१२-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, मुळा-मुठा नदी दिवसेंदिवस घातक जीवाणूंचे (बॅक्टेरिया) उगमस्थान ठरत असून संशोधकांना मुळा-मुठा नदीच्या पाण्यात सुमारे पंचवीस प्रकारचे घातक जीवाणू आढळले असून यातील बहुतेक जीवाणू हे कोणत्याही प्रतिजैविकांना प्रतिसाद देत (अँटी रेझिस्टंट) नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१६ पासून शहरातील संशोधकांनी या विषयावर संशोधन केले असून या संशोधनात नदीच्या उगमाच्या जवळच्या परिसरातील पाणी आणि शहरातील पाणी यांच्या गुणवत्तेमध्ये तफावत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घातक जीवाणूंमुळे रोगांची तीव्रता वाढून त्वचा, श्वसनाचे व मूत्रविकारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०१-०२-२०१९) :** (१) याबाबतचा शोध निबंध इंटरनॅशनल जरनल ऑफ एन्व्हॉरमेंटल रिसर्च ॲण्ड पब्लिक हेल्थ यांनी त्यांच्या संकेतस्थळावर जून, २०१८ मध्ये प्रसिध्द केला होता.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेतंर्गत मुळा- मुठा नदी संवर्धनाकरिता पुणे महानगरपालिकेस रु. ९९०.२६ कोटीची योजना केंद्र शासनाने मंजूर केली आहे. या योजनेतंर्गत मुळा- मुठा नदीमध्ये मिसळणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता ११ सांडपाणी प्रक्रीया सयंत्रणा उभारणे पुणे महानगरपालिकेच्यावतीने प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**कोरची (जि. गडचिरोली) येथील मसेली शासकीय आदिवासी वसतिगृहातील प्रलंबीत असलेली कामे पूर्ण करण्याबाबत**

**(४०) १३१९०४ (०६-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि. गडचिरोली) येथील आदिवासींच्या मुला-मुलींना राहण्यासाठी मसेली येथे आदिवासी विभागाने रुपये तीन कोटी खर्च करुन शासकीय वसतिगृहाची इमारत बांधली असून गेल्या चार वर्षांचा कालावधी उलटूनही इमारतीचे काम अपूर्ण असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. आदिवासी विकास मंत्री यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी मुलांच्या वसतिगृहात अद्याप विद्युत जोडणी, पिण्याच्या पाण्याची व प्रलंबित असलेली कामे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरचे वसतिगृहाचे काम पूर्ण करून किती कालावधीत सुरू करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) (३) व (४) गडचिरोली जिल्हायातील कोरची तालुक्यात मसेली येथे आदिवासी मुलांकरिता शासकीय वस्तीगृह क्षमता ७५ व आदिवासी मुलींकरिता शासकीय वस्तीगृह क्षमता ७५ अशी दोन स्वतंत्र वस्तीगृहे बांधण्यात आलेली आहेत. आदिवासी मुलींचे वस्तीगृहाचे स्थापत्य बांधकाम व अंतर्गत विद्युतीकरणाचे कामाचे कार्यरंभ आदेश दि. २२.०२.२०१६ मध्ये देण्यात आले होते व सदर काम मार्च, २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. आदिवासी मुलांच्या वस्तीगृहाचे स्थापत्य बांधकाम व अंतर्गत विद्युतीकरणाचे कामाचे कार्यरंभ आदेश दि.२२.०२.२०१६ मध्ये देण्यात आले होते,सद्यस्थितीत किरकोळ काम वगळता स्थापत्य काम ९० टक्के पुर्ण झाले असून, विद्युत जोडणीचे काम सार्वजनिक बांधकाम (विद्युत) उपविभाग, गडचिरोली यांच्याकडून प्रगतीत आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची व शिल्लक राहिलेली प्रलंबित कामे (दरवाजे, खिडक्या) इ. करण्याकरिता व उर्वरित देखभाल दुरुस्तीकरिता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर यांचेकडून सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतचे अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही सुरु आहे.

---

**टंचाईग्रस्त जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व नगरविकास विभागामार्फत करण्यात आलेल्या तात्पुरत्या पुरक पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४१) १३२११४ (१०-१२-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टंचाईग्रस्त जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व नगरविकास विभागामार्फत करण्यात आलेल्या तात्पुरत्या पुरक पाणी पुरवठा योजनेची भंडार पडताळणी न करता टंचाईचा कालावधी संपल्यावर पाईप व मोटारीची विल्वेवाट लावून गैरव्यवहार केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) याबाबत सर्व जिल्हयांकडून अहवाल मागविण्यात आला असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील वस्त्रोदयोग कारखान्यातील आयात वस्तूंच्या दरवाढीमुळे उद्योग संकटात आल्याबाबत**

**(४२) १३२५३७ (०६-१२-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रुपयाची घसरण झाल्यामुळे सोलापूर जिल्हयातील वस्त्रोदयोग कारखान्यातील आयात वस्तूंचे दर वाढल्यामुळे हे उदयोग संकटात आले असल्याचे माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील संकटात सापडलेल्या उद्योगांना सहाय्य मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) रुपयाचे मुल्य घसरण झाल्यामुळे आयात वस्तूवरील दरामध्ये वाढ झाली आहे. परिणामी वस्त्रोद्योगांना आयात यंत्रसामुग्रीवर जादा रक्कम खर्च करावी लागली.

आंतरराष्ट्रीय चलनात होणाऱ्या चढउतारामुळे रुपयाचे अवमुल्यन झालेले आहे. यावरील नियंत्रण राज्य शासनाच्या अखत्यारित नाही.

राज्यातील वस्त्रोद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी शासन निर्णय दि. १५.०२.२०१८ अन्वये वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ जाहीर करण्यात आले आहे.
तसेच वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी खालील अन्य योजना सुरू केल्या आहेत.
(१) शासन निर्णय दि.०५/१२/२०१७ नुसार राज्यातील साध्या यंत्रमागांना त्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजात ५ टक्के अनुदान ५ वर्षासाठी देण्यात येते.
(२) शासन निर्णय दि. ११/०१/२०१७ नुसार सहकारी सुतगीरण्यांना प्रतीचाती रू.३०००/- कर्ज घेतल्यास त्यावरील १२% व्याज अनुदान ५ वर्षासाठी देण्यात येते.
(३) शासन निर्णय दि. ०६/०६/२०१८ नुसार साध्या यंत्रमागाचा दर्जा वाढविण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते.
(४) शासन निर्णय दि. २१.१२.२०१८ नुसार राज्यातील वस्त्रोद्योगांना वीज सवलत लागू केली आहे.
(५) शासन निर्णय दि. १६.०१.२०१९ नुसार वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान देण्याची योजना लागू केली आहे.

---

## अंबाडी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ओमकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(४३) १३२५५७ (०४-१२-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाडी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ओमकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, या संस्थेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संस्थेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार असल्याने गत १७ वर्षात वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१९) :** (१) नाही.
(२) नाही.
संस्थेच्या नोंदवहीवरुन संस्थेने मागील १७ वर्षात दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा घेतलेल्या दिसून येतात.
(३) संस्थेच्या सभासदांनी गैरव्यवहाराबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी सहायक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी यांनी दिनांक २५.१०.२०१७ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत

अधिकाऱ्याची नियुक्ती केली. कलम ८३ च्या अहवालाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी श्री.आर.के. भास्कर, सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांची नियुक्ती करण्यात आली. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालामध्ये संस्थेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नसल्याने कोणावरही जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील अनुसूचित जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत**

**(४४) १३२६१५ (०६-१२-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गेल्या दोन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळालेली नाही हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निधीची तरतूद करुन या विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती त्यांना तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील लोणीव्यंकनाथ सेवा संस्थेतील गैरव्यवहाराबाबत**

**(४५) १३२६७० (०४-१२-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील लोणीव्यंकनाथ सेवा संस्थेत जागा खरेदी करताना एकाच जागेची दोन वेळा खरेदी व विक्री करण्यात आली असून यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यहार करण्यात आला असून, या संस्थेने एका मयत व्यक्तीच्या वारसदाराची दोन लाख रुपयांच्या विमा रक्कमेची अफरातफर करुन फसवणूक केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधीत दोषीविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच मयत व्यक्तींच्या वारसदारांना विम्याची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०२-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) (i) संबंधित संस्था सचिवास निलंबित केले आहे.

(ii) जागा खरेदीतील संस्थेचे आर्थिक नुकसानबाबत संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये सहायक निबंधक श्रीगोंदा यांनी दिनांक १४/११/२०१८ अन्वये निर्देश दिले आहेत.

(iii) सदर निर्देशास अनुसरून संस्थेच्या संचालक मंडळ व सचिव यांचेकडून दिनांक २६/१२/२०१८ रोजी मुद्दल आणि व्याज असे एकूण रू.१,७५,०००/- रक्कमेची वसूली केली आहे.

(iv) विमा रक्कम अपहाराबाबत मयत व्यक्तीच्या पत्नी यांना दोषींविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

(v) संबंधित महिलेस दिनांक २६/०९/२०१८ रोजी सव्याज रक्कम रूपये २,९५,५००/- मिळाले असून त्यांनी त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

(vi) सदर प्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४६ अन्वये प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना दिनांक २२/११/२०१८ रोजी सादर केला असून त्याबाबत सुनावणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी सेवा सहकारी संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(४६) १३२६८६ (०४-१२-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी सेवा सहकारी संस्थेतील गैरव्यवहार तसेच संस्थेतील गट सचिवांबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ ते २०१८ या कालावधीतील अंकेषण त्रुटीच्या अनेक तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील निवेदनाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या त्रुटींचे निराकरण करण्याबाबत तसेच आदिवासी भागातील कर्ज वाटप व बोगस ७/१२ कर्ज अवाटप संबंधित तक्रारीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०२-२०१९) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) होय, चौकशी करण्यात आली आहे.
चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील माथा सेवा सहकारी संस्था या संस्थेच्या सचिवांवर खालील तीन आरोप होते. (१) दिनांक ०५/०४/२०१८ रोजीच्या व्यवस्थापक मंडळाच्या सभेची नोटीस संस्थेच्या संचालकांना दिली नसल्याबाबत, (२) सहायक निबंधक सहकारी संस्था ता.कोरपना यांनी दिलेल्या पत्रावर सचिवांचा खुलासा समाधानकारक नसल्याबाबत, (३) सचिवांनी आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मांडवा या संस्थेचे पुनर्गठन/रूपांतर कर्जवाटप करताना अनेक शेतकऱ्यांकडून पैसे वसूल केले. तथापि, त्यांनी सदरची रक्कम संस्थेत जमा केली नाही.

या तीन आरोपांपैकी आरोप क्रमांक १ सिध्द झाला असून आरोप क्रमांक २ व ३ सिध्द झाले नसल्यामुळे संबंधित सचिवास ताकीद पत्र देऊन बदली करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ऊस ठिंबकसाठी व्याजदरात सवलतीच्या योजनेला नाबार्डकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) १३३१९४ (०६-१२-२०१८). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊस ठिंबकसाठी व्याजदरात सवलतीच्या योजनेला नाबार्डकडून निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी ऊस उत्पादक शेतक-यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऊस ठिंबक सिंचनला नाबार्ड कडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०२-२०१९) :** (१) अशा प्रकारचे निवेदन आढळून आले नाही.
(२) ऊस ठिंबक सिंचन योजनेकरीता नाबार्डकडून निधीची तरतुद करणेबाबत साखर आयुक्त कार्यालयाने दिनांक०५ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना कळविले आहे.
सदर योजनेअंतर्गत बँकांनी प्रथम शेतकऱ्यास कर्ज पुरवठा करून फेरकर्ज उचल प्रस्ताव राष्ट्रीय बँकेस सादर करणेबाबत नाबार्डने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात विंधन विहिर अधिग्रहण प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) १३३६६६ (२९-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात चालूवर्षी अत्यल्प पर्जन्यमान झाल्याने साखरा व इतर अनेक गावात पिण्याच्या पाण्याची पावसाळ्यात टंचाई निर्माण झाली असून ग्रामपंचायतीने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पाणी टंचाई निवारणासाठी विंधन विहीर अधिग्रहण करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती लातूर यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास लातूर जिल्हयात पाणीटंचाई निवारणासाठी किती ग्रामपंचायतीने पंचायत समितीकडे अधिग्रहण मागणीचे प्रस्ताव सादर केले आहेत, त्यानुषंगाने पाणी टंचाई निवारणासाठी अधिग्रहण प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासन नियमानुसार किती कालावधी अपेक्षित आहे तसेच सदर प्रस्तावास मंजुरी देणे व पाणीटंचाई निवारण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) लातूर जिल्हयातील १६६ गावे/वाडयांमधील पंचायत समितीकडे प्राप्त झालेल्या २४१ विहीर/विंधन विहीर अधिग्रहणाबाबतच्या प्रस्तावांपैकी ९१ गावे/वाडयांमधील ११४ विहीर/विंधन विहीर अधिग्रहणाबाबतच्या प्रस्तावांस उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर मंजूरी देण्यात आलेली आहे.

विहीर अधिग्रहण प्रस्ताव मंजूरीसाठी निश्चित असा कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही. प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थळ पाहणी अहवाल व अन्य बाबी तपासणी करुन नियमानुसार आवश्यकतेनुसार लवकरात लवकर मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलदरा व धारणी तालुक्यातील (जि.अमरावती) पंचायत समित्यांमध्ये पेसा कायद्यांतर्गत केलेल्या साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(४९) १३३८७३ (०७-१२-२०१८) श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा व धारणी तालुक्यातील (जि. अमरावती) दोन्ही पंचायत समित्यांमध्ये पेसा कायद्यांतर्गत केलेल्या साहित्य खरेदीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जून, २०१८ च्या दुस-या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वापरात नसलेल्या साहित्याची खरेदी करुन कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत पंचायत समिती धारणी येथील ६२ तसेच पंचायत समिती चिखलदरा येथील ५२ अशा ११४ ग्रापंचायती मध्ये ५% थेट निधी अंतर्गत शासन निर्णयातील निकषाप्रमाणे शिक्षण, आरोग्य व स्वच्छता या बाबींवर सन २०१६-१७ या कालावधीत ग्रापंचायतींमार्फत निधी खर्च करण्यात आला होता. सदर निधीमधुन ग्रामपंचायतीद्वारे गावाकरिता आर.ओ. मशिन, एल.ई.डी. पथदिवे तसेच शाळेतील मुलांकरिता ई-लर्नींग सुविधा, प्रोटिन पावडर खरेदी करण्यात आलेले होते. सदर साहित्य खरेदी प्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे कडुन चौकशी पथक नेमण्यात आलेले होते. सदर चौकशीत पंचायत समिती धारणी व चिखलदरा अंतर्गत एकुण ६३ ग्रामसेवक/ ग्रा.वि.अ. हे अनियमित्ता केल्याप्रकरणी दोषी आढळलेले असुन त्यांचे कडुन एकुण रु.२९,२५,९१९/- (अक्षरी- एकोणतीस लक्ष पंचविस हजार नऊशे एकोणाविस फक्त) एवढी वसुली निश्चित करण्यात आली असून संबंधितांकडून वसुलीची कार्यवाही सुरु आहे. त्यासोबतच वरील ६३ ग्रामसेवक/ ग्रा वि अ पैकी ५५ ग्रामसेवक/ ग्राविअ यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली असून ८ ग्रामसेवक/ ग्राविअ यांना सक्त ताकिद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केडगाव (ता. दौंड जि. पुणे) येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत**

**(५०) १३४०६१ (०७-१२-२०१८) श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या बारामती परिमंडळ कार्यालयातंर्गत येणाऱ्या १३ विभागीय कार्यालयांपैकी केडगाव विभागीय कार्यालयाचे विभाजन करून दौंड व शिरूर हे विभाग करण्याची स्थानिक नागरिकांची मागणी सन २०१४ पासून समोर आली असून याबाबत

लोकप्रतिनिधींनी देखील अनेक वेळा मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील सेवाक्षेत्र फक्त वीज ग्राहक संख्या या एकमेव निकषावर आधारित असून सदर निकषात १४.१०.२०१६ बदल करण्यात आला आहे, परंतु अद्याप केडगाव विभागीय कार्यालयाचे विभाजन करून दौंड व शिरूर हे विभाग करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन तालुक्यांसाठी एकच विभागीय कार्यालय असल्याने तेथील नागरिकांना दूर अंतरावरून प्रवास करून कार्यालयात यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महावितरण कंपनीने प्रसृत केलेल्या मानकातील तरतुदीनुसार विभाग निर्मितीसाठी किमान १,२०,००० वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. विद्यमान केडगाव विभागाची एकूण ग्राहक संख्या २,२१,३६२ इतकी आहे. केडगाव विभागाचे विभाजन करून मागणी केलेले शिरूर विभागीय कार्यालय निर्माण केल्यास केडगाव विभागाची ग्राहक संख्या १,०६,६८३ व मागणी केलेल्या शिरूर विभागाची ग्राहक संख्या १,१५,२४८ इतकी राहणार असल्यामुळे, दोन्हीं कार्यालये प्रत्येकी १,२०,००० इतक्या ग्राहक संख्येचा निकष पूर्ण करत नाहीत. त्यामुळे शिरुर तसेच दौंड विभागीय कार्यालय निर्माण करणे सद्य:स्थितीत शक्य नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.